आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२२ एप्रिल २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी तयार केलेल्या महाराष्ट्र कामगार संहितेला मंत्रिमंडळाची मंजुरी, मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा द्यायलाही मान्यता

- मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये पहिली ते पाचवीसाठी हिंदी भाषा अनिवार्य ऐवजी ऐच्छिक करण्याची शिक्षण मंत्र्यांची घोषणा

- UPSC च्या २०२४ च्या नागरी सेवा परीक्षांचा निकाल जाहीर, पुण्याचा अर्चित डोंगरे देशात तिसरा

**आणि**

- देशात सोन्याच्या दरानं गाठला तोळ्यामागे १ लाख रुपयांचा टप्पा

**<><><><><>**

केंद्रीय कामगार संहितेच्या अनुषंगानं राज्यातल्या **कामगार** कायद्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी तयार केलेल्या महाराष्ट्र कामगार संहिता नियमांना आज राज्य सरकारनं मंजुरी दिली. मुंबईत आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. केंद्र सरकारने २९ कामगार कायद्यांचं एकत्रिकरण करून चार कामगार संहिता तयार केल्या आहेत. या कामगार संहिताची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यांना नियम तयार करावे लागणार आहेत. त्यानुसार राज्याच्या कामगार विभागानं महाराष्ट्र वेतन संहिता नियम २०२५ आणि महाराष्ट्र औद्योगिक संबंध संहिता नियम २०२५ तयार केले आहेत. यांना आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

**मत्स्य व्यवसायाला** कृषीचा दर्जा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामुळे मच्छिमार, मत्स्यसंवर्धक आणि मत्स्य कास्तकारांना कृषी क्षेत्राप्रमाणेच पायाभूत सुविधा आणि सवलती उपलब्ध होणार आहेत. तसंच मत्स्य

व्यवसायिकांना कृषी दरानं वीजपुरवठा, किसान क्रेडिट कार्ड, बँक कर्ज सुविधा, अल्प दरात विमा संरक्षण तसंच सौर ऊर्जा योजनेचा लाभ मिळणार आहे.या निर्णयाचा राज्यातल्या ४ लाख ८३ हजार मच्छीमारांना फायदा होणार असल्याचं मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितलं.

**पायाभूत** सुविधांच्या अंमलबजावणीत बाधित झोपडपट्टी पुनर्वसनाच्या योजनेतल्या घरांची निर्मिती आणि वितरणासाठीच्या धोरणात सुधारणा करण्याचा निर्णयही या बैठकीत झाला.

**त्याचप्रमाणे** गोसीखुर्द प्रकल्पाच्या २५ हजार ९७२ कोटी रुपयांच्या खर्चाच्या तरतुदी मंत्रीमंडळानं मान्यता दिली. सातारा जिल्ह्यात नायगावमध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकासाठी १४२ कोटी रुपयांची तरतुद करायलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली.

**<><><><><>**

राज्यातल्या पहिली ते पाचवीच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी भाषा अनिवार्य नव्हे तर ऐच्छिक करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. यासंदर्भात तज्ञांशी चर्चा करुन लवकरच शासन निर्णय जारी केला जाईल, अशी माहिती शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी मंत्रालयात झालेल्या वार्ताहर परिषदेत दिली. राष्ट्रीय शिक्षण धोरणात ३ भाषा धोरण सुचवलं आहे. त्यानुसार हा निर्णय घेतला आहे पण यासाठी केंद्राची सक्ती नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. सुकाणू समिती, राज्यभरातले तज्ञ, विविध शिक्षण तज्ञ यांच्याशी चर्चा करुनच हा निर्णय घेतला होता, अशी माहिती राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार यांनी दिली.

केंद्र सरकारच्या पीएम श्री शाळांच्या धर्तीवर सीएम श्री शाळा सुरू केल्या जाणार आहेत. यात केंद्र पातळीवर एक शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित केली जाईल, अशी माहिती शिक्षण मंत्र्यांनी दिली. याशिवाय उर्वरित शाळांमधला एक वर्ग

आदर्श वर्ग म्हणून विकसित केला जाईल. तसंच राज्यातल्या ८ विभागात कला, क्रीडा यासारख्या क्षेत्रातल्या निवासी प्रशिक्षण देणाऱ्या आनंद गुरुकुल शाळा सुरू करणार असल्याचं ते म्हणाले. शाळांमध्ये अटल क्रीडा स्पर्धा आणि बाळासाहेब ठाकरे कला स्पर्धा आयोजित करण्याची घोषणाही त्यांनी केली. यामध्ये राज्यपातळीवर प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरीक्त गुण दिले जाणार आहे.

**<><><><><>**

सौदी अरेबियाच्या दोन दिवसीय दौऱ्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज जेद्दाह इथं पोचले. विशेष सन्मान म्हणून, सौदी हवाई क्षेत्रात प्रवेश केल्यापासून सौदीच्या शाही वायूदलातल्या एफ-१५ लढाऊ जेट विमानांनी मोदी यांच्या विमानाची सोबत केली.  विमानतळावर २१ तोफांची सलामी देऊन त्यांचं स्वागत करण्यात आलं. या दौऱ्यामुळे भारत आणि सौदी अरेबिया यांच्यातली मैत्री दृढ होईल, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमात म्हटलं आहे. आज आणि उद्या विविध कार्यक्रमांमधे सहभागी होण्यासाठी आपण उत्सुक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

गरीब मुस्लिमांच्या भल्यासाठीच वक्फ कायद्यात सुधारणा केल्याचा पुनरुच्चार केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रीजिजू यांनी आज केला. मुंबईत ते वार्ताहर परिषदेला संबोधित करत होते. लवकरच वक्फ मालमत्तांची यादी प्रसिद्ध केली जाणार असून जगातली सर्वात मोठी वक्फ मालमत्ता देशात असल्याचं ते म्हणाले.

वक्फ सुधारणा कायद्याच्या बाबतीत विरोधकांकडून अपप्रचार केला जात आहे. नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी, सत्य त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं ते म्हणाले.

देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच संयुक्त संसदीय समितीने केलेल्या १४ सुधारणा सरकारनं मान्य केल्या अशी माहिती या विधेयकाच्या चाचणीसाठी

स्थापन केलेल्या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यावेळी म्हणाले. राहुल गांधी यांनी या विधेयकावरच्या चर्चेत सहभाग घेतलाच नाही. त्यामुळं या सुधारणा असंवैधानिक आहे, असं ते कसं काय म्हणू शकतात, असा सवाल त्यांनी केला.

<><><><>

काँग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी आज मुंबईत आपल्या कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

<><><><>

UPSC च्या २०२४ च्या नागरी सेवा परीक्षाच्या निकालात शक्ती दुबे देशात पहिल्या क्रमांकावर आहे. हर्षित गोयल दुसऱ्या आणि पुण्याचा अर्चित डोंगरे देशात तिसऱ्या स्थानी आणि राज्यात पहिल्या स्थानी आहे. त्यानं वेल्लोर इथल्या व्हीआयटीमधून इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीमध्ये पदवी शिक्षण घेतले असून युपीएससी परीक्षेत तत्वज्ञान हा पर्यायी विषय घेतला होता. शिवांश सुभाष जगदाळे राष्ट्रीय पातळीवर २६व्या स्थानी आहे. देशातल्या पहिल्या १०० मध्ये राज्यातले ७ उमेदवार आहेत.

यावेळी एकूण १००९ उमेदवारांची विविध नागरी सेवांसाठी निवड झाली आह. त्यात १८० IAS साठी, ५५ IFS साठी आणि १४७ उमेदवार IPS साठी निवडले गेले आहेत. यामध्ये एकूण ९० विद्यार्थी महाराष्ट्रातले आहे.

<><><><>

देशात सोन्याच्या दरानं आज तोळ्यामागे १ लाख रुपयांची पातळी ओलांडली. इंडियन बुलियन अँड ज्वेलरी असोसिएशनने दिलेल्या दरांनुसार दिवसअखेर २४ कॅरेट सोनं प्रति तोळा १ लाख १ हजार ४०० रुपयांपेक्षा महाग मिळत होतं. सकाळी २२ कॅरेट सोन्याचे दर १ लाख १ हजार ६०० रुपयांपेक्षा अधिक झाले होते मात्र संध्याकाळी ते ९९ हजारांपर्यंत खाली घसरले. कालच्या तुलनेत सोनं

सुमारे अठराशे रुपयांनी महाग झालं. चांदी सुमारे ९८ हजार ५०० रुपये किलोनं मिळत होती. कमोडिटी बाजारातही सोन्याचे व्यवहार १ लाख रुपयांच्यावर होत होते.

जगभरातल्या केंद्रीय बँकांनी वाढवलेली सोनं खरेदी तसंच सोनं ही सुरक्षित गुंतवणूक वाटत असल्यानं गुंतवणूकदार सोनं खरेदीकडे वळत असल्याचं तज्ञांचं मत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि अमेरिकन फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांच्यातल्या तणावामुळेही सोन्याचा दर वाढल्याचं तज्ञ म्हणतात.

<><><><><>

पोषण आहार पंधरवड्यानिमित्त जालना जिल्ह्यात विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. प्रकल्प अधिकारी कोमल कोरे यांनी सांगितलं..

**होल्ड - बाइट - कोमल कोरे...**

<><><><><>

राज्यातली पाण्याची स्थिती जाणून घेऊन ज्या ठिकाणी टंचाई आहे तिथं उपाययोजना करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. तसंच १५ जुलैपर्यंत पाणी पुरेल असं नियोजन करायला सांगितलं. राज्यातले सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, यांच्यासोबत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली, त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. ज्या भागातल्या पाणीपुरवठा योजना प्रलंबित आहेत त्या लवकरात लवकर पूर्ण कराव्या असं शिंदे यांनी सांगितलं.

<><><><><>

बुलडाणा जिल्ह्यातल्या केस आणि नख गळतीच्या आजाराच्या कारणाचा शोध घेऊन उपाययोजना करण्याचे निर्देश केंद्रीय आयुष आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय पथकाला आज दिले.

रुग्णांना पुन्हा त्रास होऊ नये म्हणून तातडीनं प्रतिबंधात्मक औषधोपचार सुरू करण्याच्या तसंच रुग्णांच्या रक्ताचे नमुने, बाधित गावातलं पाणी, माती, धान्य आदींचे नमुने संकलित करून प्रयोगशाळेत तपासणी करून अहवाल सादर करण्याच्या सूचनाही जाधव यांनी दिल्या.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौ सुपर जायंटस आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात लखनौ इथं सामना होणार आहे. थोड्याच वेळात, साडे सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात हवामान मुख्यतः कोरडं राहील, असा अंदाज आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरण राहील, तर विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहील, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**